जी.एस.टी.सह किंमत रु. १७७००/-

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

२४०२/२ अ अपना बँक इमारत, शिवाजी पेठ, कोल्हापूर पिन कोड - ४१६०१२
दुरध्वनी क्रं. ०२३१ - २६२६१४७ फॅक्स नं. ०२३१ - २६२६७५०
**Email -** dmckolhapur@gmail.com
**Web -** www.mahalaxmikolhapur.com www.shreejyotiba.com

## ई - निविदा फॉर्म

## सन २०२२

**देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयाकडे व्यवस्थेस असलेल्या श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी कडील गट नं.- १,४,५,६,७,८ व देवस्थान मिळकती मध्ये (कोल्हापूर रस्त्यावरील चव्हाण तळयानजीक चा नाका व गिरोली रोडवरील श्री. यमाई बागेजवळील ) खुली जागा वाहनतळ (पार्किग) भाडे वसुलीचा आदेशाचे दिनांकापासून ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीचा मक्ता**

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर

फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०

E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com www.shreejyotiba.com


## जाहीर ई-निविदा सूचना

देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयाकडे व्यवस्थेस असलेल्या श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी कडील गट नं. गट नं.-१,४,५,६,७,८ व देवस्थान मिळकती मध्ये (कोल्हापूर रस्त्यावरील चव्हाण तळयानजीक चा नाका व गिरोली रोडवरील श्री.यमाई बागेजवळील ) खुली जागा वाहनांच्या पार्किंगकरिता पे ॲण्ड पार्क या तत्वावर ठेका पध्दतीने आदेशाचे दिनांकापासून ते दि.३१/०३/२०२४ कालावधीकरिता देणेची आहे.

| अ.नं | वाहनतळाचे ठिकाण | वाहनाचा प्रकार | किमान वार्षिक देकार (प्रिमियम) रक्कम रु | टेंडर बयाणा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी कडील गट नं.-१,४,५,६,७,८ व देवस्थान मिळकती मध्ये (कोल्हापूर रस्त्यावरील चव्हाण तळयानजीक चा नाका व गिरोली रोडवरील श्री. यमाई बागेजवळील ) खुली जागा ( यातील बांधकाम क्षेत्र वगळून ) वाहनतळ (पार्किग) भाडे वसुलीचा आदेशाचे दिनांक पासुन ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीचा मक्ता | दुचाकी, चारचाकी, ट्रक्स व अवजड वाहने | रु.२,००,००,०००/- (+१८% G.S.T) | रु. ६,००,०००/- |

सदर कामगिरीचे टेंडर www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर भरणेचे आहे. यासाठी प्रथम एकवेळ सदर वेबसाईटवर टेंडरदारास नोंदणी करावी लागेल व स्वत:ला user name व password तयार करावा लागेल. सदरची नोंदणी मान्य केलेनंतर टेंडरदारास देवस्थान समितीकडे टेंडर फॉर्मची रक्कम ऑनलाईन भरणा करता येईल.तद्नंतर ऑनलाईन टेंडर फॉर्म डाऊनलोड करुन टेंडरदारास शर्ती-अटी पहाण्यासाठी उपलब्ध होतील. टेंडर देणा-याने शर्ती-अटी मान्य असलेबाबत सही करुन टेंडर देणेचे आहे.

१. टेंडर फॉर्म व टेंडर बयाणा रक्कम देवस्थान व्यवस्थापन समिती,पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर प्रधान कार्यालयाकडे ऑनलाईन भरणेची आहे.
२. निविदा फॉर्म खरेदी करणा-या इच्छुक टेंडरधारकांनी निविदा फॉर्मची किंमत रु.१५,०००/- + जी.एस.टी.२७००/- अशी एकूण रु. १७७००/- ऑनलाईन भरणा करणेची आहे.
३. टेंडर डॉक्युमेंटस www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.१०/०८/२०२२ रोजी दुपारी १.०० पासून दि.२५/०८/२०२२ सायं.५-३० पर्यंत उपलब्ध होतील.
४. प्री बिड मिटींग दि.१७/०८/२०२२ रोजी दुपारी ११.३० वा देवस्थान व्यवस्थान समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर मुख्य कार्यालयात होईल.
५. निविदा फॉर्म ऑनलाईन सादर करणेची अंतिम दि.२५/०८ /२०२२ रोजी सायं.५-३० पर्यंत.

६. निविदा उघडणेचे (शक्य झालेस) दि.३०/०८/२०२२ रोजी दु. १२.०० वाजता.

७. टेंडरदाराने ऑनलाईन निविदा तांत्रिक लिफाफा (Technical Bid) व व्यापारी लिफाफा (Commercial Bid) पध्दतीने भरणेची आहेत. एकदा ऑन लाईन निविदेतील दर भरलेनंतर दरामध्ये बदल करता येणार नाही. (दर काळजीपूर्वक तपासा व मगच सबमिट स्वीच ऑन करा.) (टेक्निकल बिडमध्ये टेंडर डॉक्युमेंटसह सर्व कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणेची आहेत व फक्त टेक्निकल बीडची कागदपत्रे हार्ड कॉपीमध्ये सिलबंद लिफाफ्यातून दि.२९/०८/२०२२ रोजी सायं.४ वाजेपर्यंत देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूरचे मुख्य कार्यालयात सादर करणेची आहेत. कमर्शियल बीड निविदेसोबतच्या फॉर्ममधील पत्रकामध्ये स्वतंत्रपणे अपलोड करणेचे आहे. कोणत्याही परिस्थितीत कमर्शियल बीड हार्ड कॉपीमध्ये सादर करणेचे नाही.)

ठिकाण - कोल्हापूर,
दिनांक -

सही /-
सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती,
पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर

## निविदाधारकांना सुचना

१) सदर निविदा ऑनलाईन पध्दतीने भरणेची आहे. निविदा भरणेसाठी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळाचा वापर करणेत यावा.
२) अपुर्ण निविदा विचारात घेतली जाणार नाही.
३) निविदा स्विकारण्याचा व प्राप्त निविदांपैकी कोणतीही एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांनी राखुन ठेवला आहे.
४) तांत्रीक लिफाफा नं.१ मध्ये नमुद कागदपत्रे अपूर्ण असलेस सदर निविदाधारक अपात्र ठरविणेत येईल व त्याचा लिफाफा नं.२ उघडला जाणार नाही.
५) निविदामध्ये नमुद केलेप्रमाणे परवानाचे मूळ प्रमाणपत्र/परवाना सादर करणेचा आहे. ज्या प्रमाणपत्रासाठी/परवान्यासाठी फी भरली आहे त्या फी ची पावती जोडली तर ती मान्य केली जाणार नाही.
६) निविदामध्ये जे परवाने/प्रमाणपत्र जोडली आहेत ती चालू कालावधीमधील असावी त्याची मुदत संपली असलेस ती ग्राहय धरली जाणार नाही.

## निविदा लिफाफा कागदपत्रांबाबतची माहिती

खालील तांत्रीक कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक आहे **(टिप- कागदपत्रे क्रमाने देणेचे आहेत)**

१) निविदा फॉर्म फी रक्कम रु.१७७००/- (जी.एस.टी.सह) ऑनलाईन पध्दतीने भरलेची पावती.
२) बयाणा रक्कम रुपये ६,००,०००/- ऑनलाईन पध्दतीने भरलेची पावती..
३) मंजुर ई निविदाधारकाने ५०% रक्कम आदेशावेळी डी.डी.ने देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे
४) वैध आयकर नोंदणी प्रमाणपत्र नंबर.
५) वस्तू व सेवा कर (जी.एस.टी) नंबर
६) जर संस्था/बचत गट/कंपनी असलेस संस्था नोंदणी प्रमाणपत्र / शॉपअॅक्ट प्रमाणपत्र (नोंदणी संबधी कागदपत्रे)
७) दंड,शिक्षा व काळया यादीत नाव नसलेबाबत प्रतीज्ञापत्र (मे.कार्यकारी दंडाधिकारीसो यांचे समोर)
८) निविदा फॉर्म मधील सर्व माहिती भरुन पान नं. १ ते ११ या प्रत्येक पानावर स्वाक्षरी करुन जोडणेचे आहे.
९) आधार कार्ड नंबर छायाकिंत प्रत.
१०) निविदा धारक यांनी मागील तीन वर्षाचे आर्थिक विवरणपत्र व आयकर रिर्टरन जोडणे.
११) ई- निविदा भरणाऱ्या व्यक्ती / फार्म / भागीदारी यांनी मागील तीन वर्षात किमान देकार रक्कमेचे काम केलेबाबतचे अनुभवाचा दाखला जोडणे.

**लिफाफा क्र. २ (दराचा लिफाफा)**

टेंडरमध्ये टेंडरदार देणार असलेल्या प्रिमियम ऑफरचे दर हे प्रचलित व भविष्यामध्ये लागू होणारे सर्व शासकीय व निमशासकीय कर विचारात घेऊन देणेचे आहेत. टेंडरदाराकडून देणेत आलेल्या प्रिमियम देकारावर सध्याच्या दरानुसार १८% दराने अतिरिक्त जीएसटी समितीस देय राहील.

निविदा धारकाची सही व शिक्का

.

## लिफाफा क्रं. १ मधील कागदपत्रांची माहिती

दिनांक :

**प्रति,**
**प्रशासक/सचिव**
**देवस्थान व्यवस्थापन समिती**
**पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर**

**विषय :-** देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयाकडे व्यवस्थेस असलेल्या श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी कडील खुल्या जागेवरील वाहनतळ (पार्किग) भाडे वसुलीचा आदेशाचे दिनांक पासून ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीचा मक्ताबाबत...

**संदर्भ :-** देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर जाहिरात दै. लोकमत दि.१०/०८/२०२२

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाधीन जाहिरातीस अनुसरुन व निविदाबाबतच्या अटी व शर्ती पूर्ण वाचून, समजून घेवून मी खाली सही करणार पुढील प्रमाणे निविदा सोबत कागदपत्रे सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | **निविदाधारकाचे/ कंपनीचे नाव** | |
| २ | संपुर्ण नाव व पत्ता | |
| ३ | फोन नं / मोबाईल नंबर | |
| ४ | जर कंपनीचे स्वरुप (खाजगी व्यक्ती, भागीदारी / प्रा. लि/ इत्यादी) भागीदारी असलेस पार्टनरशीप,/ बचतगट/ संस्था यांचे रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट इ. निविदेसोबत जोडावी | |
| ५ | निविदा फॉर्म फि ऑनलाईन रक्कम रु. /- भरलेचा पावतीची छायांकित प्रत | |
| ६ | बयाणा रक्कम रु | |
| ७ | वैध आयकर पॅन कार्ड नंबर-छायांकीत प्रत | |
| ८ | जी.एस.टी.प्रमाणप्रत्र | |
| ९ | आधार कार्ड यांची छायांकित प्रत | |
| १० | आयकर विवरण पत्र मागील ३ वर्षाची | |
| | अटी व शर्ती मान्य असले बाबतचे पत्र | |

निविदाधारकाची स्वाक्षरी

निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्यानूसार निविदाधारकावर येणाऱ्या कायदेशीर आर्थीक जबाबदाऱ्या विचारात घेवून सदर निविदा सादर करण्यात येत आहे. (या शिवाय अधिक माहिती दयावयाची असल्यास वेगळा कागद जोडावा वरील पुर्वअर्हतेबाबतची प्रमाणपत्र/कागदपत्रे सोबत ऑनलाईन कागदपत्राच्या यादीसाठी कृपया निविदेचे पृष्ठ क्रं. ३ व ४ लिफाफा क्रं १ तांत्रिक लिफाफा वाचावा व त्याप्रमाणे कागदपत्रे ऑनलाईन सादर करावीत.)

**आपला विश्वासू,**

**निविदाधारकाचे नाव व सही**

**देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयाकडे व्यवस्थेस असलेल्या श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी कडील खुल्या जागेवरील वाहनतळ (पार्किंग) भाडे वसुलीचा आदेशाचे दिनांका पासून ते दि. ३१ /०३ /२०२४ या कालावधीचा मक्ताबाबत...**

## अटी व शर्ती

१. वर नमूद केले दराने टेंडर बयाणा रक्कमेची पावती सादर केलेल्या टेंडरदारांची टेक्निकल बिडस् उघडणेत येतील. तसेच, टेक्निकल बिड मध्ये पात्र ठरलेल्या टेंडरदारांचीच कमर्शियल बिडस् उघडणेत येतील.

२. टेंडर मंजूरीचे पत्र (टेंडर स्वीकृती पत्र ) दिलेपासून १० दिवसांच्या आत मंजूर टेंडरदार यांनी सुरक्षा ठेव म्हणून मंजूर देकार रकमेच्या २५ टक्के रक्कम रोख / डी.डी. / राष्ट्रीयकृत बँकेच्या बँक गॅरंटी स्वरुपात करार मुदतीसाठी देणेची आहे व रितसर करार करुन देणेचा आहे. कायदयातील तरतुदीनुसार योग्य रक्कमेच्या स्टँप पेपरवर रितसर करार करुन देणेचा आहे. बँक गॅरंटी स्वरुपात अथवा रोखीने दिलेल्या रक्कमेवर देवस्थान समितीकडून व्याज दिले जाणार नाही.

३. मंजूर टेंडरधारकांना सुरक्षा ठेवीची रक्कम वरीलप्रमाणे दिलेनंतर टेंडर बयाणा रक्कम देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर बिनव्याजी राहील.

४. मंजूर टेंडरदारांची सुरक्षा ठेव एक वर्षाची कराराची मुदत संपलेनंतर दोन महिन्यात जर येणे बाकी असलेस ते रितसर वजा करुन परत केली जाईल. सुरक्षा ठेव रक्कम परत करतांना त्यावर व्याज दिले जाणार नाही.

५. टेंडर स्वीकृतीपत्र मिळालेपासून मंजूर टेंडरदार यांनी मुदतीत सुरक्षा ठेवीची पुर्तता न केलेस, अगर टेंडर स्वीकारणेस असमर्थता दर्शविलेस टेंडर बयाणा रक्कम खास जमा करुन घेणेत येईल व संबंधीत टेंडरदाराची निविदा नामंजूर करुन, सदरची कामगिरी अन्य मार्गाने करुन घेणेत येईल. टेंडरदाराने मंजूरी प्रक्रियेपूर्वी अगर तीन महिन्यांचे आत टेंडर प्रक्रियेतून माघार घेतलेस अशा टेंडरदाराची टेंडर बयाणा रक्कम जप्त करणेत येईल.

६. टेंडर्स फक्त https// mahatender.gov.in या वेबसाईटवरच भरणेची आहेत.

७. टेंडर नोटीसीमध्ये नमूद तारखेनंतर अगर वेळेनंतर ऑनलाईने टेंडर सादर करणेची सुविधा उपलब्ध असणार नाही.

८. टेंडरसोबत जी जोडलेली आहेत त्या कागदपत्रांवर टेंडरदाराची सही असणे आवश्यक आहे. तसेच टेंडरदार यांनी यापूर्वी इतरत्र काम केलेबाबत व तेथे केलेल्या टेंडर मुदतीतील कोणत्याही कामामध्ये कसूर नसलेबाबतचे संबधीत संस्थेकडील अधिकृत पत्र टेंडरसोबत जोडणे आवश्यक आहे.

९. टेंडरमध्ये टेंडरधारक देणार असलेल्या प्रिमियम ऑफरचे दर हे प्रचलित व भविष्यामध्ये लागू होणारे सर्व शासकीय व निमशासकीय कर विचारात घेऊन देणेचे आहेत. टेंडरदाराकडून देणेत आलेल्या प्रिमियम देकारावर सध्याच्या दरानुसार १८% दराने जीएसटी देय राहील. ( उदा.- निविदा धारकाकडुन निविदेमध्ये रक्कम रु. १,००,०००/- इतकी रक्कम नमुद केली तर सदर रक्कमेवर १८ टक्के प्रमाणे जीएसटी रक्कम रु. १८,०००/- सह एकूण रक्कम रु. १,१८,०००/- देवस्थान समितीकडे भरावे लागणार आहेत.) कोणत्याही परिस्थितीत/कारणास्तव

अगर ऐनवेळी नवीन कर लागू झालेचे कारणास्तव अगर प्रचलित कराचे दरामध्ये बदल झालेचे कारणास्तव दिलेल्या प्रिमियम ऑफरचे दरामध्ये बदल करता येणार नाही. कोणत्याही करासंबधीची जबाबदारी देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांचेवर राहणार नाही.

१०. मंजूर टेंडरधारक यांना कोणत्याही सबबीस्तव इतर पार्टीजना कंत्राटीचे काम परस्पर तबदील करणेचा अधिकार असणार नाही व टेंडरमधील कोणत्याही कामासाठी देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांचे पूर्व परवानगीशिवाय पोट कंत्राटदार नेमता येणार नाही.

११. मंजूर टेंडरधारक ही जर भागीदारी फर्म असेल व कोणत्याही कारणान्वये टेंडरसंबधी झालेला करार पूर्ण होण्यापूर्वी फर्मची भागीदारी रद्द झाल्यास सदर कामाची पूर्तता करणेची जबाबदारी वैयक्तिक व संयुक्तिकरित्या सर्व भागीदारांची राहील आणि टेंडरधारक ही लिमिटेड किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी असेल त्या कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांची राहील. मंजूर टेंडरधारकडून टेंडर शर्ती-अटी किंवा करारातील कोणत्याही शर्ती-अटी यांचा भंग झाल्यास ठेकेदाराचा ठेका तात्काळ विना नोटीस टेंडर रद्दबातल केले जाईल आणि सुरक्षा ठेव/बँक गॅरंटीची रक्कम जप्त केली जाईल.

१२. टेंडर मुदतीत कोणत्याही कारणास्तव वाहनधारकांकडून वसूल करावयाचे पार्किंगचे दर वाढवून दिले जाणार नाहीत अगर कंत्राटदारास परस्पर वाढविता येणार नाहीत. त्याचप्रमाणे देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांचेकडून निश्चित करुन दिलेल्या जागेपेक्षा जादा जागेमध्ये पार्किंग व्यवस्था राबविता येणार नाही.

१३. या कामाची मुदत,वर्क ऑर्डरमध्ये नमूद तारखेपासून एक वर्षाकरिता राहील. तथापि देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर सदरचे जागेवर अन्य प्रकल्प विकसीत करावयाचा झालेस किंवा तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत विकास कामासाठी सदरची जागा देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर पुन्हा ताब्यात घेतलेस, ठेकेदार यांना पूर्वसूचना देऊन सदरची जागा ताब्यात घेऊन करार संपूष्टात आणणेत येईल. याबाबत मा.प्रशासकसो देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत ठेकेदारांना कोणत्याही अखत्यारीकडे दाद मागता येणार नाही.अशी परिस्थिती उदभवलेस ठेकेदाराने देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूरकडे आगाऊ भरलेल्या रकमेपैकी समितीस देय असलेली रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम ठेकेदारास बिनव्याजी आदा करणेत येईल. या कराराची मुदत कमी करणेचे अगर, एक वर्ष कालावधीनंतर मंजूर ठेका रक्कमेचा आढावा घेऊन, पुढील ई-निविदा प्रक्रिया कार्यन्वीत होऊ पर्यत वाढविणेचे अधिकार मा.प्रशासकसो देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांना राहतील.

१४. भागीदारी फर्मकडून टेंडर भरताना ते प्रत्येक भागीदाराच्या स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे. परंतु, एखादा भागीदार हजर नसेल त्यावेळी त्यांचेतर्फे कायदेशीर अधिकारपत्र असलेल्या दुस-या कोणत्याही इसमास सही करुन देता येईल. मात्र टेंडरसोबत भागीदारीपत्राची प्रत टेक्निकल बीड मध्ये जोडणे आवश्यक आहे.

१५. टेंडरमध्ये टेंडर देणा-याने कोणतीही अट घालून टेंडर देणेचे नाही. अथवा अटीचा विचार केला जाणार नाही व अशी अट देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांचेवर बंधनकारक राहणार नाही. टेंडर दिल्यानंतर त्याबाबत कसलाही खुलासा किंवा सबब विचारांत घेतली जाणार नाही. किमान अपेक्षित देकारापेक्षा कमी देकाराचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

१६. ज्या वैयक्तिक,भागीदारी अगर कंपनीचे नांवे रजिस्टेशन करुन टेंडर खरेदी केले असेल, त्यांचेच नांवाची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे व त्या नावांनेच टेंडर मंजूर/नामंजूर करणेत येईल.

१७. देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर वाहनांचे प्रकारानुसार खाली निश्चित केले दराप्रमाणे निविदा धारकांनी वाहनतळावर वाहन भाडे वसूल करणेचे आहे.तथापि सदर शर्तीचा भंग झालेप्रसंगी ठेकेदाराचा ठेका तात्काळ विना नोटीस रद्द करणेचा अधिकार देवस्थान व्यवस्थापन समितीस राहील.

**वाहन पार्किगसाठी खालीलप्रमाणे प्रति बारा तास दर राहतील**

| **अ.न** | **वाहन प्रकार** | **दर रुपयामध्ये जी. एस. टी. सह** |
|---|---|---|
| १ | दुचाकी वाहन | रु. ६.०० |
| २ | रिक्षा | रु. ६.०० |
| ३ | ट्रॅक्स,टेंपो,टॅक्सी,जीप,कार | रु. २०.०० |
| ४ | ट्रॅक्टर,ट्रॅव्हलर | रु. ६०.०० |
| ५ | लक्झरी बस ट्रक | रु. १२०.०० |

( देवस्थान व्यवस्थापन समिती,पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर, शासकिय वाहन, आरोग्य विभाग, आमदार,खासदार, पोलिस प्रशासन, अत्यावश्यक सेवा देणारे विभाग यांचे वाहन मोफत सोडणेचे आहे )

१८. वर नमूद पार्किंग फी चे दर हे जीएसटी करासह असून, टेंडरदाराने सदरचा वसूल केलेला जी.एस.टी.मुदतीत संबंधीत कार्यालयाकडे भरणा करणेचा आहे. तसेच ग्राहकांना देणेत येणा-या पार्किंग फी चे पावतीवर टेंडरदाराचा जी.एस.टी. क्रमांक स्पष्टपणे नमूद करणेचा आहे.

१९. वर नमूद दराने पार्किंग फी वाहनधारकांकडून वसूल केलेनंतर संबंधितांना द्यावयाचे पावतीवर पार्किंगची रक्कम आणि जी.एस.टी. रक्कम स्वतंत्रपणे दर्शवून एकत्रित (पूर्णांकित रक्कम) वसुलात आणणेची आहे.

२०. ज्याच्या नांवे टेंडर मंजूर होईल, त्याने एकूण टेंडर ठेक्यापैकी ५० टक्के रक्कमेचा पहिला हप्ता निविदा स्विकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांत देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांचेकडे भरल्याशिवाय त्यास वर्क ऑर्डर देण्यात येणार नाही.सदरची रक्कम मुदतीत भरलेनंतर उर्वरित ५० टक्के रक्कम

वर्क ऑर्डर तारखेपासून सहा महिन्यांचे आत देवस्थान समितीकडे भरणा करणे आवश्यक आहे. मंजूर टेंडरदाराने आगाऊ भरणा केलेली प्रिमियमची रक्कम कोणत्याही सबबीस्तव परत दिली जाणार नाही.

२१. प्रिमियमची रक्कम देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांचेकडे मुदतीत भरणा न केलेस थकीत देय रकमेवर द.सा.द.शे.१५ टक्के प्रमाणे व्याज आकारणी करणेत येईल.

२२. मंजूर टेंडरदार यास पे ॲण्ड पार्किंगची जागा निश्चित करुन दिलेनंतर मंजूर पे ॲण्ड पार्किंगच्य जागेवर विविध प्रकारच्या जाहिराती प्रसिध्द करणेचे हक्क देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर याचे राहतील. त्यापासून प्राप्त होणा-या उत्पन्नावर कंत्राटदारास हक्क सांगता येणार नाही.

२३.पार्किंगसाठी उपलब्ध करुन दिलेल्या जागेमध्ये ठेकेदारास अन्य कोणताही व्यवसाय करता येणार नाही अगर अशा व्यवसायासाठी जागा उपलब्ध करुन देता येणार नाही.

२४.वाहनतळासाठी लागणारी विद्युत व्यवस्था उपलब्ध कणेरची व त्यांची बिले भागविणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. वाहनतळावर ठेकेदाराने स्वत: अगर स्वत:चे खर्चाने कर्मचारी ठेवून वसूल करणेचा आहे. अशा कर्मचा-यांची नांवे व पूर्ण पत्ता फोटोसह देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूरकडे आगाऊ देणेचा आहे. सदर कर्मचा-यांना एकसारखाच गणवेश देणेचा आहे. व त्याचे बॅच व ओळखपत्र गणवेशावर लावणे बंधनकारक आहे.

२५.ठेकेदार अगर त्यांचे कर्मचा-यांनी वाहनतळावर सभ्य वर्तन केले पाहिजे. आलेल्या वाहनधारकांशी कोणताही वादविवाद न करता सौजन्याने वागले पाहिजे. एखादे प्रसंगी वादाचा प्रसंग उद्‌भवून पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद झालेस, त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यास देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर हे जबाबदार राहणार नाही.नियूक्त केलेले कर्मचारी त्यांचे ओळखपत्रासह यादी देवस्थान समिती,पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.कार्यरत कर्मचारी व कर्मचारी यांची दिलेली यादीमध्ये विसंगती येता कामा नये.याबाबत अनुचित प्रकार घडलेस त्यास आपणास ई-निविदाधारक जबाबदार राहील.

२६. वाहनतळावर वाहनांची मोडतोड, चोरी, नादुरुस्ती व फसवणूक करणे यास सर्वस्वी ठेकेदारच जबाबदार राहील. देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूरचे अधिपत्याखाली असलेल्या श्री.केंदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरीकडे नमुद केलेल्या वाहनतळाच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी ठेकेदार यांचेवर राहील. वाहनतळाचे नुकसान झालेस त्याची भरपाई ठेकेदाराकडून करुन घेतली जाईल.

२७.वाहनतळाचा उपयोग वाहनतळासाठीच केला पाहिजे. त्याठिकाणी अन्य व्यवहार होत असलेचे निदर्शनास आलेस, करारभंग झालेचे समजून तात्काळ ठेका रद्द करणेत येईल. वाहनतळावर कोणत्याही प्रकारचे कायम अगर तात्पुरते अतिक्रमण/बांधकाम ठेकेदाराने करु देणेचे नाही व स्वत:ही करणेचे नाही.

२८.कोणत्याही कारणास्तव ठेक्याच्या मुदतीत केव्हांही ठेका रद्द करणेचा व ठेकेदारास वाहन फी वसुली न करणेस सांगणेचा हक्क देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांना आहे.तथापि ठेकेदाराने कोणतेही

शर्तीचा भंग केलेप्रसंगी ठेकेदाराचा ठेका विना नोटीस रद्द करणेचा अधिकार देवस्थान व्यवस्थापन समितीस राहील याबाबत ठेकेदारास तक्रार करतां येणार नाही अगर नुकसान भरपाई मागता येणार नाही.

२९. सरकारी हुकूम,नैसर्गिक आपत्ती व अन्य अपरिहार्य कारणाने वाहनतळ बंद राहिल्यास त्याबाबत ठेकेदारास कोणतीही तक्रार करता येणार नाही अगर त्याबाबत त्यास ठेक्याच्या रक्कमेतून सूट मिळणार नाही व उर्वरित रक्कमही मागता येणार नाही.

३०. देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांनी नमुद केलेले दर पत्रकाचे फलक यांचेवर नमुद करुन ते वाहनतळावर ठळकपणे प्रदर्शित करुन वाहनतळ,वाहनकर वसुली ठिकाणी व इकडील निर्देशित केले ठिकाणी लावणेचे असून, सदर फलकांवर ठेकेदाराचे संपूर्ण नांव,पत्ता,फोन नंबर व ठेक्याचा कालावधी नमूद करणेचा आहे.तसेच, अट क्र.१८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पार्किंग दर ठळकपणे प्रसिध्द करणेचे आहेत.जेणेकरून ते सर्व प्रवासी भाविक यांना वाचन करता येईल.फलकावर तक्रार निवारण अधिकारी यांचे नाव व मोबाईल नंबर नमुद असावा.

३१. वरीलप्रमाणे बसविणेत आलेले बोर्डस, इकडून निर्देशित करणेत आलेल्या ठिकाणी बसविणेचे असून, सदरचे बोर्डस् खराब झालेस अगर निघालेस ते त्याच दिवशी तातडीने बसविणेचे आहेत. देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर कडील अधिका-यांचे तपासणीवेळी वरीलप्रमाणे बोर्डस् प्रदर्शित झाले नसलेचे निदर्शनास आलेस असे बोर्डस् देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांचेकडून बसविणेत येतील व त्यासाठी येणारा खर्च कंत्राटदाराने आदा करणे बंधनकारक राहील

३२. ठेकेदार यांनी वाहनतळ नियमांचे कोणत्याही परिस्थितीत उल्लंघन करणेचे नाही. तसेच, कोणत्याही वेळी वाहनतळाची तपासणी करणेचा अधिकार देवस्थान व्यवस्थापन समिती,पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर कडील अधिका-यांना राहील/ अथवा देवस्थान व्यवस्थापन समितीकडून नियुक्त करणेत आलेल्या कर्मचा-यास राहतील.

३३. देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांनी टेंडर मुदतीत वेळोवेळी केलेल्या सुचनांचे तत्काळ पालन ठेकेदारांनी करणेचे असून अशा केलेल्या सूचनांचे पालन न केलेस ठेकेदार यांना आगाऊ नोटीस देऊन टेंडर रद्द करणेत येईल.

३४. ठेकेदार यांनी पार्किंग जागेच्या ठेक्याच्या कालावधीचे करारपत्र स्वखर्चाने करुन देणेचे आहे. त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे त्यानी उपलब्ध करुन देणेची आहेत.

३५. मंजूर टेंडरधारक याने शर्तिचा भंग केलेस अगर अन्य कारणाने कॉन्ट्रॅक्ट रद्दबातल झालेस उर्वरित मुदतीसाठी फेर टेंडर मागविले जाईल. किंवा इतर कोणत्याही रितीने दुसरीकडून कामगिरी करवून घेतली जाईल. त्यामध्ये देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर फायदा झालेस मुळ टेंडरदारकास तो मिळणेस पात्र राहणार नाही, मात्र त्यात नुकसान झालेस मुळ टेंडरदार यांचेकडून नुकसानीची वसुली केली जाईल. तसेच सुरक्षा

ठेवीची रक्कम खास जमा करुन घेऊन, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर भविष्यातील कंत्राट/ठेका त्या टेंडरधारक यांना अपात्र (ब्लॅकलिस्ट) ठरविले जाईल.

३६. करारी मुदतीमध्ये सदर कामगिरी संबधी कोणतेही वाद निर्माण झालेस त्यासंबंधी मा.प्रशासकसो देवस्थान समिती यांचा निर्णय अंतिम राहील.

३७. सदर कामगिरीच्या कराराची मुदत ठेका ताब्यात दिलेनंतर एक वर्ष कालावधीपर्यंत (३१/०३/२०२४ ) अखेर राहील. सदर मुदतीनंतर पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास ठेक्याची मुदत वाढविणे अगर करार नुतनीकृत करण्याचे अधिकार मा.प्रशासकसो देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर यांना राहतील व त्यास देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर अंतिम मंजूरी घेणेत येईल.

३८. कोणतेही किंवा सर्व टेंडर्स कारण न देता नाकारणेचा अधिकार मा.प्रशासकसो देवस्थान समिती यांना राहील.

३९. मंजूर टेंडरधारक व देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांचे दरम्यान कोणत्याही कारणास्तव वाद निर्माण झाल्यास त्याचे न्यायाधिकरण कोल्हापूर राहील.

४०. सदरचा ठेक्याचे काम स्वत:हा करणेचे असून मार्फत उपकंत्राटदार नेमता येणार नाही.अन्यथा तात्काळ विना नोटीस मक्ता रद्द करणेत येईल.

वरील अ.क्रं. १ ते ४० मध्ये नमूद केलेल्या सर्व टेंडर शर्ती व अटी मला मान्य आहेत.

**निविदाधारकाचे नाव व**

**सही**

# प्रपत्र. २ (दराचा लिफाफा)

**देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयाकडे व्यवस्थेस असलेल्या श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी कडील गट नं.-१,४,५,६,७,८ व देवस्थान मिळकती मध्ये (कोल्हापूर रस्त्यावरील चव्हाण तळयानजीक चा नाका व गिरोली रोडवरील श्री.यमाई बागेजवळील ) प्रमाणे जागेवरील वाहनतळ (पार्किग) भाडे वसुलीचा मक्त्याबाबतची निविदा**

**प्रति,** **दिनांक -**

**प्रशासक/सचिव**
**देवस्थान व्यवस्थापन समिती**
**पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर**

**निविदाधारकाचे नाव :**

**निविदाधारकाचा पत्ता:**

## निविदा एक्सेल BOQ नमुना

| क्र. | निविदा तपशील | एकत्रीत रक्कम अंकी व अक्षरी (जीएसटी वगळून) |
|---|---|---|
| १ | श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी कडील गट नं.-१,४,५,६,७,८ व देवस्थान मिळकती मध्ये (कोल्हापूर रस्त्यावरील चव्हाण तळयानजीक चा नाका व गिरोली रोडवरील श्री. यमाई बागेजवळील ) प्रमाणे जागेवरील वाहनतळ (पार्किग) भाडे वसुलीचा मक्ता आदेशाचे दिनांक पासून ते ३१/०३/२०२४ | BOQ मध्ये जीएसटी वगळून रक्कम नमुद केली<br>**होय / नाही** |

सदरहू मक्ता मी / आम्ही वरील नमुद केले रक्कमेस श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी कडील पार्किग मक्ता आदेशाचे दिनांक पासून ते दि.३१/०३/२०२४ अखेर राहिल या संबधी सर्व माहिती घेतली असून, सर्व अटी व शर्ती मान्य आहेत त्यानूसार मी/आम्ही पार्किग मक्ता स्विकारणेस तयार आहे/आहोत. **सदर कामी भरणेत आलेला दर हा जीएसटी वगळून असुन भरलेल्या दरावर लागू दरानुसार जीएसटी जादा भरणेचा आहे.**

**(निविदा देणाऱ्यांचे नाव, सही, शिक्का)**

**टीप - तांत्रिक लिफाफ्यामध्ये सदर प्रपत्र अपलोड करताना दर नमुद करणेचा नाही. फक्त होय किंवा नाही इतकेच नमुद करणेचे आहे. सदर मक्त्याचा दर हा ई निविदा मध्ये Excel BOQ मध्ये नमुद करावयाचा आहे.**

**सदरहू मक्ता मी / आम्ही वरील नमुद केले रक्कमेस श्री केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी कडील पार्किग मक्ता आदेशाचे दिनांक पासून ते दि.३१/०३/२०२४ अखेर राहील या संबधी सर्व माहिती घेतली असून सर्व अटी व शर्ती मान्य आहेत त्यानुसार मी/आम्ही पार्किग मक्ता स्विकारणेस तयार आहे/ आहोत सदर कामी भरणेत आलेला दर हा जी.एस.टी वगळून असून भरलेल्या दरावर लागू दरानुसार जी.एस.टी जादा भरणेचा आहे.**

निविदाधारकाची स्वाक्षरी